महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय आणि सहकार न्यायालय यांचा आकृतीबंध निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र २०१७/ प्र. क्र. ३/५ स
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९.

<u>वाचा:</u>-१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक राजस १००८/ प्र.क्र. ५३८/ ५ स, दिनांक ५/५/२०११

२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचा दिनांक ५/५/२०१७ चा निर्णय

३) वित्त विभाग पृष्ठांकन क्रमांक पदनि -२०१९/प्र.क्र.०९/१९/आपुक, दिनांक २०/२/२०१९

<u>प्रस्तावना:-</u>

मा. उच्च न्यायालय , मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक १५६/२०११ च्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ५/५/२०१७ रोजी, " सहकार न्यायालय व सहकार अपिल न्यायालये यांच्यासाठी जिल्हा न्यायालयांच्या आणि दिवाणी न्यायालयाच्या धर्तीवर स्वतंत्र आकृतीबंध मंजूर करण्यात यावा तसेच त्यांचा सहकार आयुक्तालयापासून वेगळा असा स्वतंत्र संवर्ग निर्माण करण्यात यावा" असा निर्णय दिला आहे. मा. उच्च न्यायालय , मुंबई यांनी दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय आणि सहकार न्यायालय यांचा स्वतंत्र संवर्ग आकृतीबंध (स्टॅफींग पॅटर्न) निश्चित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयासाठी दिनांक ५/५/२०११ च्या शासननिर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या आकृतीबंधातील खाली नमूद केलेली २५५ पदे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय व सहकार न्यायालय यांचेकडे वर्ग करून महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय आणि सहकार न्यायालय यांचा स्वतंत्र संवर्ग निर्माण करण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे .

अ.क्र	संवर्ग	पदनाम	पदसंख्या	वेतनश्रेणी
१	**२**	**३**	**४**	**५**
१		अध्यक्ष (अपील न्यायालय)	१	Pay in judicary service
२		सदस्य (अपील न्यायालय)	५	Pay in judicary service
३		न्यायाधिश	३१	१५६००-३९१००+ग्रेड पे ५४००
	एकूण वर्ग १		**३७**	
४		सहायक निबंधक	२	९३००-३४८००+ग्रेड पे ४४००
	एकूण वर्ग २		**२**	

अ.क्र	संवर्ग	पदनाम	पदसंख्या	वेतनश्रेणी
१	२	३	४	५
५		लघुलेखक उच्चश्रेणी	१	९३००-३४८००+ग्रेड पे ४४००
६		कार्यालय अधिक्षक	१	९३००-३४८००+ग्रेड पे ४३००
७		लघुलेखक निम्नश्रेणी	३६	९३००-३४८००+ग्रेड पे ४३००
८		लेखापाल वरिष्ठश्रेणी	१	९३००-३४८००+ग्रेड पे ४२००
९		मुख्यलिपीक	२१	९३००-३४८००+ग्रेड पे ४२००
१०		शिरस्तेदार	१९	९३००-३४८००+ग्रेड पे ४२००
११		वरिष्ठ लिपीक	७	५२००-२०२००+ग्रेड पे २४००
१२		कनिष्ठ लिपीक	६२	५२००-२०२००+ग्रेड पे १९००
१३		वाहन चालक	१	५२००-२०२००+ग्रेड पे १९००
	एकूण वर्ग ३		**१४९**	
१४		नाईक	२	४४४०-७४४०+ग्रेड पे १६००
१५		शिपाई	६५	४४४०-७४४०+ग्रेड पे १३००
	एकूण वर्ग ४		**६७**	
	एकूण वर्ग १+२+३+४		**२५५**	

२. १) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील सदर २५५ पदे वर्ग केल्यानंतर तितकीच पदे सहकार विभागाच्या आकृतीबंधातून कमी होतील .

२) सहकार आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील कार्यरत पदांपैकी न्यायालयीन संवर्ग वगळता उर्वरीत अधिकारी /कर्मचारी हे त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार ते सहकार न्यायालयाच्या किंवा सहकार आयुक्तालयाच्या आस्थापनेवर कार्यरत राहतील. तसेच, गट-ड ची नाईक व शिपाई संवर्गातील ६७ पदे त्या पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंत सहकार न्यायालयाच्या आस्थापनेवर कार्यरत राहतील. जसजसे सदर पदांवरील कर्मचारी निवृत्त होतील तसतशी ती पदे काल्पनिक पदांमध्ये रूपांतरीत होतील व बाहययंत्रणेव्दारे भरण्यात येतील .

३) जिल्हा न्यायालय व दुय्यम न्यायालय व दुय्यम न्यायालयातील पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यासाठी नियुक्त केलेल्या मा. दाभोळकर समितीच्या अहवालानुसार सहकार अपिल व सहकारी न्यायालये यांचा आकृतीबंध अंतिम करण्याच्या अधिन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे .

३. सदर शासननिर्णय उच्चस्तर सचिव समितीच्या दिनांक ८/२/२०१९ च्या बैठकीत विषय क्रमांक ८ बाबत समितीने घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे .

४. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था , महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आकृतीबंधातून महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय व सहकार न्यायालय यांच्याकडे वर्ग करण्यात येत असलेल्या सदरच्या २५५ पदांना सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय व सहकार न्यायालय यांच्यामार्फत वेतन व भत्ते अदा करण्यात येतात .

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था , महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सदरचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा परत घेण्याच्या दरम्यानच्या कालावधीत या अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्ते अदा करण्यासंबंधीची कार्यवाही विद्यमान पध्दतीनुसार महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय व सहकार न्यायालय यांचेकडून करण्यात यावी .

५. सदर शासननिर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक१०९/आपुक, दिनांक २५/२/२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे .

६. सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२२८१५१६५१८२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे .

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing Tax Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, cn=Sudin Gaikwad
Date: 2019.02.28 15:22:19 +05'30'

(डॉ. सुदिन गायकवाड)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई
२. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
४. सर्व मा. संसद सदस्य, मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
७. सचिव , राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
८. सचिव, राज्य माहिती आयुक्त, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१०.प्रबंधक, लोकायुक्त / उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११.प्रधान महालेखापरिक्षक, लेखा परिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२.सहकार आयुक्ता, महाराष्ट्र राज्य, पुणे (३ प्रती)
१३.सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१४.महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा) मुंबई

१५.महालेखापाल-२,महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा) नागपुर
१६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९.वित्त विभाग (अर्थसंकल्प -३/ व्यय-२/ वित्तीय सुधारणा-१/आ.पु.क.) मंत्रालय, मुंबई
२०.निवड नस्ती, कार्यासन ५-स